त्या सातवीला असताना महात्मा गांधींच्या विचारांनी प्रभावित झाल्या. पुढे राजाराम महाविद्यालयातून बी.ए झालेले ध्येयवादी तरूण गोविंदराव ज्ञानोजीराव साळुंखे तथा बापूजी साळुंखे यांच्याशी त्यांचा विवाह डिसेंबर १९४० मध्ये अत्यंत साधेपणाने झाला. तेथून पुढे सुशीलादेवींच्या आयुष्यातील एका तेजस्वी पर्वाला सुरूवात झाली. विवाहापूर्वी त्यांना माहित होते की आपला विवाह समाजाचा संसार करणाऱ्या एका ध्येयवेड्या माणसाशी होत आहे. आयुष्यभर आपल्यालाही समाजासाठीच जगावयाचे आहे. सुशीलादेवीनी बापूजींच्या जीवन पद्धतीशी अनुरूप जीवन आनंदाने स्वीकारले.

विवाहानंतर थोड्याच काळात बापूजी सोंडूर संस्थानात दाखल झाले आणि या ठिकाणी सुशीलादेवींना सोंडूर राजघराण्याचा सहवास लाभला. आपल्या शिक्षणसंस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे साहेब आपल्या या आईच्या आठवणी सांगताना म्हणतात की, 'आमच्या आईने फार सोसून ही शिक्षण संस्था मोठी करण्यासाठी प्रयत्न केले आहेत.'

घरात भांडी नव्हती, धान्य ठेवायला डबे नव्हते. सुशीलादेवी बाजारातून धान्य आणायच्या आणि जमिनीवर ओतून ढीग करायच्या. विहिरीवर अंघोळ करून धुण्याचे

पिळे अंगावर टाकून यावे लागे. सुशीलादेवी गरिबीत बापूजींच्या पाठीशी खंबीरपणे उभ्या राहिल्या.

पोटी दुःख आणि निःशब्दता हे संयमाचे लक्षण आहे. स्थितप्रज्ञाचे जीवन कसे असू शकते याची प्रचिती सुशीलादेवी यांच्या जीवनाकडे पाहिल्यानंतर येते. जीवनात आनंदच हरवून बसलो, तर मग जगण्याचे प्रयोजनच उरणार नाही, हे त्यांचे तत्वज्ञान होते. सुशीलादेवींनी बापूजींना राजवैभवात जेवढ्या आनंदाने साथ दिली तेवढ्याच आनंदाने त्यांना आव्हानात्मक जगण्यातही साथ दिली. अनेक संकटांचा सामना त्यांनी हसतमुखाने केला.

बापूजी जसे ध्येयवादी कार्यकर्ते होते, तसेच ते प्रापंचिक सद्गृहस्थ होते. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचा प्रसार ते ज्यावेळी करित होते, त्याच वेळी त्यांच्या धर्मपत्नी सुशीलादेवी या धैर्याने बापूजींचा संसार चालवित होत्या. संपूर्ण महाराष्ट्रातून गोरगरिब, दलित व अनाथ मुले वस्तीगृहात दाखल झालीत. त्यावेळेस वस्तीगृहात स्वयंपाकीण बाईस देण्यासाठी वीस रूपये बापूजींजवळ नव्हते. त्यावेळी त्यांच्या सहचारिणी सुशीलादेवी यांनी ही जबाबदारी उचलली व मुलांना स्वतः स्वयंपाक करून जेऊ खाऊ घातले. मुलांच्या कपडे शिलाईसाठी खर्च होऊ नये हणून त्या शिलाई काम करू लागल्या. वसतीगृहातील मूलांची दुखणी, आजारपण यात त्या मुलांची काळजी घेत. सणासुदीला मुलांना गोडधोड खायला घालत. यातून त्यांचे आभाळाएवढे मातृत्व दिसून येते.

आई खरंच काय असते ?
लेकराची माय असते.
वासराची गाय असते,
दुधावरची साथ असते,
लंगड्याचा पाय असते,
खरंच आई देवाहुनी श्रेष्ठ असते.

आपल्या संस्थेचे कार्याध्यक्ष, माननीय प्राचार्य अभयकुमारखजी साळुंखे साहेब संस्थांमाता सुशीलादेवी यांची आठवण काढताना सांगतात की, 'वस्तीगृहातील मुलांना जेवण मिळावे म्हणून आईने आपले दागिने गहाण ठेवायला बापूजींकडे दिले. संस्था चालवत असताना आईचा पुज्य बापूजींना नेहमीच पाठींबा असायचा. फकिराचा संसार तिने कुरकुर न करता नेटाने चालविला व आम्हा भावंडाना मोठे केले. संस्थाकामानिमित्त बाहेर पडलेले पुज्य बापूजी रात्री अपरात्री गुरुदेव कार्यकर्ते यांच्यासह परतले. त्यांच्या जेवणाची काळजी संस्थामाता स्वतः घेत. घरी आलेला कुणीही गुरुदेव कार्यकर्ता कधीच उपाशी राहिला नाही.'

संस्थामाता सुशीलादेवी यांनी पूज्य बापूजींना हयातीमध्ये त्यांच्या सर्व कार्यात साथ दिली आणि बापूजींच्या महानिर्वाणानंतर दुःख विसरून संस्थेला सात्विकतेचे बळ देत राहिल्या. संस्थामाता स्वतः नेहमीच खडतर आयुष्य जगून समाजाचे, आपल्या विद्यार्थ्यांचे, गुरुदेव कार्यकर्ते यांचे आयुष्य सुखरूप करित राहिल्या.

''बापूजींनी घाम गाळून, रक्त आटवून आपली संस्था उभी केली, वाढवली. आता तुम्ही त्यांचे कार्य पुढे न्या !'' असे मार्गदर्शन त्या नेहमी करायच्या. संस्थामाता सुशीलादेवी, आम्हा सर्वांची मायमाऊली, लढण्याची अक्षय उर्जा देऊन दिनांक २२ ऑक्टोंबर २०१३ अनंतात विलीन झाली.

स्मृतीत तुमच्या मिळते स्फूर्ती
गाते रसाळ तुमच्या किर्ती
भाव फुले ही तुम्हास अर्पण
स्मृतीस तुमच्या शतशः वंदन ।।

आमच्या या संस्थामाता यांच्या समर्पित व्यक्तित्वाने मातृत्वाचा एक वैश्विक अविष्कार संपूर्ण भारत वर्षाला व शिक्षण क्षेत्राला अनुभवयास मिळाला. त्यांचे अनंत उपकार संस्थेवर, समाजावर, आम्हा सर्वांवर आहेत. याची परतफेड करणे ह्या जन्मात तरी शक्य नाही. माझा हा छोटासा प्रयत्न संस्थेच्या संस्थामाता सुशीलादेवी यांच्या महान स्मृतीस उजाळा देण्यासाठी असून त्यांचे चरित्र आम्हा लेकरांसाठी सदेव स्फूर्तीदायी राहील. पूज्य बापूजी व संस्थामाता सुशीलादेवी यांना कोटी कोटी प्रणाम.

।। जय बापूजी ।। जय संस्थामाता ।।

❖❖❖

महापूर आणि कोल्हापूर

कु. प्रिती भिसे, बी.ए. २

कोल्हापूर हे महाराष्ट्रातील एक ऐतिहासिक आणि संस्कृती संपन्न शहर आहे, पण गेल्या काही वर्षात कोल्हापूरला वारंवार महापूराचा सामना करावा लागला आहे. कोल्हापूर शहरातील पंचगंगा नदी ही महत्वाची नदी असून ती कृष्णा नदीची उपनदी आहे. २००५ आणि २०१९ मध्ये आलेल्या महापुरामुळे कोल्हापूर शहर आणि परिसरात मोठया प्रमाणावर नुकसान झाले या अभ्यासात या दोन महापूराची तुलना करून पूरस्थितीचा अभ्यास करण्यात आला आहे. ब्रिटीशांच्या काळापासून कृष्णाकाठी कुरूंदवाड येथे नदीच्या काठावर महापुराच्या खुणांची नोंद केली आहे. ५३६ मीटरपेक्षा जास्त पुराची नोंद १९१४, १९३२, १९३३, १९३४, १९४३, १९४१, १९४८, १९५३, १९५६, १९५९, १९६१, १९८९, २००५ व २०१९ साली झाली आहे.

आपल्याला दिसून येते की, महापुर आला की अलमट्टी धरण हे कारण समोर येते परंतु अलमट्टी धरण बांधण्यापूर्वी म्हणजे २००५ च्या महापुरापेक्षा १९१४ साली आलेला महापुर केवळ ४ सेंटीमीटर कमी होता. म्हणजेच अलमट्टी धरण बांधण्यापूर्वी ही कृष्णेला सातत्याने महापूर येत होता. म्हणजे अलमट्टी हे तर कारण आहेच पण याबरोबरर अनेक कारणे आहेत तर ती कारणे कोणती व या महापुराची तीव्रता कमी करण्याासाठी नेमक्या उपाययोजना कोणत्या हे संशोधनातून मांडले आहे आणि जागतिक बँकेने यात लक्षदेखील दिले आहे. म्हणजेच ही किती गंभीर समस्या आहे यावर विचार करावा लागतो.

महापुराची तीव्रता वाढण्याची कारणे म्हणजे हवामानामध्ये होत असलेल्या बदलामुळे पावसाळयामध्ये ढगफुटी सदृश्य कमी कालावधीत पडणारा जास्त पाऊस हा महापूराचे प्रमुख कारण आहे. नद्यांच्या खोऱ्यामध्ये महापूराच्या वेळी पाणी साठून राहणाऱ्या विस्तृत खोलगट भागावर भराव टाकून बांधकामे केल्यामुळे २००५ च्या तुलनेत २०१९ ला कमी पर्जन्याची नोंद होवूनही पुराच्या पाण्याची पातळी वाढली आहे. नदीच्या पाणलोट क्षेत्रातील जंगलव्याप्त क्षेत्र व डोंगराळ भागातील वृक्षतोडीमुळे जमीनीची कमी झालेली जलधारण क्षमता व वाहत्या पावसाच्या पाण्याबरोबर वाहत येवून धरणामध्ये साचलेला गाळ त्यामुळे पूरनियंत्रणासाठी बांधण्यात आलेल्या धरणाची कमी होत असलेल्या जलसाठवणूक क्षमता महापूरासाठी काही प्रमाणामध्ये जबाबदार आहे. पंचगंगा नदीला प्रयाग चिखली, शिवाजी पूल, कसबा बावडा, शिरोली, वळीवडे, गांधीनगर, रूकडी, रांगोली, हेरवाड, नांदणी, नरसोबावाडी

या ठिकाणी असलेल्या नागमोडी वळणामुळे महापुराच्यावेळी सभोवतालच्या क्षेत्रामध्ये महापूराची तीव्रता वाढते. पंचगंगा व कृष्णा नरसोबावाडी, कुंभी व भोगावती, प्रयाग चिखली या नद्यांचा काटकोनामध्ये होणारा संगम महापुराच्या वेळी नद्या एकमेकांमध्ये पाणी सामावून घेत नसल्यामुळे सभोवतालच्या क्षेत्रामध्ये महापूराची तीव्रता वाढते. पुणे, बेंगलोर राष्ट्रीय महामार्ग तसेच कोल्हापूर रत्नागिरी राष्ट्रीय महामार्गाची भराव टाकून दिवसेंदिवस वाढत असलेली उंची पंचगंगा नदीच्या पात्रामध्ये गतीरोधकाचे काम करत असल्यामुळे महापूराची तीव्रता वाढत आहे. पंचगंगा नदीच्या पात्रामध्ये असलेल्या कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यामुळे महापूराच्या पाण्यास अडथळा होवून महापूराची तीव्रता वाढत आहे.

महापूराची तीव्रता कमी करण्यासाठी कराव्या लागणाऱ्या उपाययोजना म्हणजे पंचगंगा नदीच्या पाणलोट क्षेत्रामध्ये होणाऱ्या अचूक पर्जन्याची नोंद झाली तर धरणांमध्ये पाणलोट क्षेत्रामधून येणाऱ्या पाण्याचा तसेच धरणांमधून करावा लागणाऱ्या जलविसर्गाचा ताळेबंद साधता येतो. त्यासाठी प्रचलित असलेल्या पर्जन्यमापक ठिकाणांमध्ये वाढ करावी लागेल. राष्ट्रीय महामार्गाचा महापूराच्या पाण्यास गतिरोधक म्हणून होत असलेला अडथळा दूर करण्यासाठी तावडे हॉटेल ते शिरोली नजीक उड्डाण पुलांची व्यवस्था तसेच रत्नागिरी महामार्गावर महापूराचे पाणी वाहून जाण्यासाठी रेडे डोह नजीक महापूराच्या पाण्याचा विसर्ग होण्यासाठी मोठे सिमेंट नळ घालण्याची व्यवस्था करावी लागेल. शहरातील नद्यांना मिळणाऱ्या नाल्यांची पावसाळयापूर्वी स्वच्छता करून नाल्यावरील अतिक्रमणे काढून नाल्यांचा प्रवाह मोकळा करायला हवा. पावसाचे पडणारे पाणी धरणांमध्ये साठवून ठेवण्यासाठी धरणे टप्या-टप्याने गाळमुक्त करणे गरजेचे आहे किंवा पाणलोट क्षेत्रात नवीन विकेंद्रीत पाणी साठयांची निर्मिती करणे गरजेचे आहे. यासाठी जलयुक्त शिवारसारखी चांगली योजना जर योग्य प्रकारे राबवली तर महापूरासारख्या समस्येची काही प्रमाणात तीव्रता कमी करता येवू शकते. पावसाळयामध्ये कोल्हापूर पध्दतीच्याा बंधाऱ्याचे दरवाजे उघडणे गरजेचे आहे. नदीचे पात्र ते ब्लु लाईन दरम्यान भराव टाकून बांधकाम करण्यावर काटेकोर निर्बंध घालणे गरजेचे आहे. तसेच ज्या क्षेत्रामध्ये बांधकामास परवानगी आहे अशा क्षेत्रामध्ये बांधकामाचे निकष काटेकोरपणे पाळणे गरजेचे आहे. पंचगंगा नदीचे पाणी नृसिंहवाडी या ठिकाणी कृष्णेच्या पात्रात मिसळण्यासाठी कृष्णा नदीच्या पात्रातील पाण्याचे प्रमाणे कमी करावे लागेल. तसेच कृष्णा नदीच्या पाण्याचे प्रमाण सांगली शहराअगोदर कमी झाले तर सांगली शहरास सुध्दा महापूराचा धोका कमी करता येईल. त्यासाठी कृष्णा नदीचे पाणी तासगाव, कवठे महांकाळ, आटपाडी व जत यासारख्या दुष्काळग्रस्त भागाकडे वळवण्यासाठी संशोधन करून दीर्घकालीन आराखडा तयार करून कार्यवाही करणे शक्य आहे.

२००५ आणि २०१९ मधील पूरस्थितीचा अभ्यास केल्यावर असे लक्षात येते की, वाढते शहरीकरण, अतिक्रमण आणि हवामान बदल यांचा पूरावर मोठा प्रभाव आहे. भविष्यात अशी परिस्थिती टाळण्यासाठी शासनाने अधिक प्रभावी योजना आखून व या उपाययोजना अंमलात आणून पूरनियंत्रण यंत्रणा मजबूत करण्याची गरज आहे.

❖❖❖

रडावं मनमोकळं...

रडणं किती महत्त्वाचं असतं
मन मोकळं होण्याचं ते एक साधन असतं.

कधी साध्या गोष्टीवरून डोळ्यांत पाणी येतं
तर कधी मोठ्या गोष्टींमुळे तेच पाणी आटतं

नाही कळत कधी त्याच साचलेल्या पाण्याचं
ओझं होतं
आणि तेच पाणी एखादे वेळेच ओसंडून वाहतं.

जेव्हा ते वाहतं तेव्हा जुन्या गोष्टींचा
चित्रपट दिसतं
वाहणं संपलं की कसं एकदम
कापसा परिस हलकं वाटतं

कोणी कुणाच्या कुशीत तर
कोणी एकांताच्या कुशीत रडतं
पण रडणं महत्त्वातं असतं,
पण रडणं महत्त्वाचं असतं.

कु. वैष्णवी घोडके
बी.एस्सी. १

'पोर'

ती दिसामासात होती
तस एक दिस मला म्हणाली, मला पोरगा हवाय
तवा म्या तिला म्हटलं, मला पोर हवीय
अखेर एक दिस पोर झाली
तवा म्या साऱ्या गावाला बर्फी वाटली
पोर हळूहळू रांगाय लागली
तिन्ही साजंच्या येळला साळतल्या गमती जमती सांगत
पोर पाटीवर गिरवायला लागली
अशाच सोन्यामासाच्या दिसात एक दिस पोर न्हातीधुती झाली
जमीन, जुमला घरदार बघून वैशाखात पोर उजवून टाकली
पोर नांदायला गेली
नवरा बायको दोघ आम्ही घर भनभनाय लागलं
सुताक आल्यागत घर कळा खायाय लागलं
पोर संसाराला लागली
पोर दिवाळीला आली, पोर दिवाळीला आली
वाळून चिपाड झालेली सासूच्या जाचानं पार कळा गेलेली
आज एक महिना झाला
पोर नांदायलाच जाईना
अखेर आज म्याच तिला जबरीनं सासरी घालवून आलो
परत आलीस तर खापलून काढील
असा दम भी म्या तिला दिला
वाटलं आता तरी पोर संसाराला लागल
आज एक महिना झाला
कस काय हाय बघावं म्हणून गेलो
आणि मसनवाटयातली राख कपाळाला फासून माघारी आलो.

कु. प्रिती राजू भिसे
बी.ए. २

आयुष्य

कोण ऐक म्हणतं कोण कान बंद कर म्हणतं
कोण बघ म्हणतं कोण डोळे बंद कर म्हणतं
कोण बोल म्हणतं कोण गप्प बस म्हणतं
खरंच जगणं खूप कठीण असतं
कारण तेच आयुष्य असतं...!

कोण हास म्हणतं कोण रडं म्हणतं
कोण चांगलं म्हणतं कोण वाईट म्हणतं
कोण नावजतं तर कोण नावं ठेवतं
खरंच जगणं खूप कठीण असतं
कारण तेच आयुष्य असतं...!

कोण वाच म्हणतं कोण लिह म्हणतं
कोण शिक म्हणतं कोण कमव म्हणतं
कोण पुढं ढकलत कोण मागं ओढत
खरंच जगण खूप कठीण असतं
कारण तेच आयुष्य असतं ...!

कोण कष्ट करतं कोण ऐतखाऊअसतं
कोण आनंद होत असतं कोण दुःख भोगत असतं
असंच आयुष्य ऊन-पावसाचे खेळ खेळतं
खरंच जगणं सुख-दुःखाचं असतं
कारण तेच आयुष्य असतं...!

कु. मिजेबा फरद्दीन जमादार,
बी.ए. २

बहिण

अनोळखी पाहुणी बनून होती घर आलीस,
सर्वांना आपलस करून गेलीस...
घरी होतीस तेव्हा वाटलं नव्हतं तू कधी दूर जाशील,
कधी वाटलं नव्हतं दूर जाता-जाता मनात घर करून जाशील...
घरी येताना आनंदाचा धडा घेवून आलीस,
जाताना मात्र अश्रूंचे भांडार देवून गेलीस...
परत जायचं होतं तर इकडे आलीस कशाला,
तुझ्या जाण्याने किती दु:ख झालयं हे कसं सांगू तुला...
दिवसभर आपल्यात झालेल्या गॉसिप आठवतात मला,
तुच सांग लाडाने का म्हणायचीस बाळा मला...
साससरी रमून गेल्यावर तुला माझी आठवण येईल का?
आलीच जर आठवण तर तुझ्या हक्काच्या माहेरी परत येशील कधी?...
तुझ्या हक्काच्या माहेरी परत येशील कधी?...

कु. कोमल कांबळे
बी.एस्सी. १

आगळी वेगळी भेट

कॅफेत भेट
असे सगळेच म्हणतात,
पण तू मला वाचनालयात भेट
असं म्हणशील का?
स्वत:बद्दल सगळेच बोलत असतात,
पण तू माझ्यासोबत पुस्तकाबद्दल बोल
असं म्हणशील का?
पुढे आपल्या मुलांची नावे काय ठेवायची
असं सगळेच म्हणतात
पण तू माझ्याकडे बघून उद्या आणखीन पुस्तके वाचूया
असं म्हणशील का?
मुलांना चांगल्या शाळेत पाठवायचं
असं सगळेच म्हणतात,
पण तू माझ्यासोबत वेगवेगळ्या पुस्तकांची चर्चा करूया
असं म्हणशील का?
आपला संसार अगदी चांगला झाला पाहिजे
असं सगळेच म्हणतात,
पण तू मला आपलं आयुष्य वाचनालयात घालवू
असं म्हणशील का?

कु. कोमल कांबळे
बी.एस्सी. १

दिवसाची सुरूवात

गर्द धुके दाटले चोहीकडे
उगवला सूर्य नभी
कोवळी किरणे सर्वत्र पसरली
शेतांनी पांघरले आहे वस्त्र जणू सोनेरी
पक्ष्यांचा किलबिलाट
झाली आहे दिवसाला सुरूवात

कु. प्रियंका शिवाजी सुर्यवंशी
बी.ए. भाग १

अंधश्रद्धा

कु. कोमल लालबहादूर कांबळे, बी.एस्सी.१

एका घरात सखाराम आणि मंजिरी हे जोडपे रहायचे. त्यांना देवधर्म करायला खूप आवडायचे. सखारामला एक बहिण होती तिचं नाव कमला. कमलाच्या लग्नानंतर कमला सखारामच्या घरी कधीतरीच यायची. जेव्हा कमला यायची तेव्हा घरी बनवलेला मेवा, भाकरी आणि रामूसाठी लिखाणाचं साहित्य घेवून यायची. रामू म्हणजेच सखाराम आणि मंजिरीचा मुलगा. अवघा सातच वर्षांचा होता, पण खूपच हुशार. घरची परिस्थिती बेताची असल्याने रामू त्यांच्या आई-बाबांकडे कधीच कोणत्याच गोष्टीचा हट्ट करत नसे. तो फक्त त्याच्या आत्याकडे एकच हट्ट करायचा ''मला पायात घालायला चपला हव्या आहेत'' त्याची आत्या त्याला पुढच्या वेळी आणेन असं म्हणायची. रामूचा चेहरा पडायचा पण नंतर आपल्याला आत्या चपला आणून देईल या आशेने तो हसत पळायचा.

दररोज शाळेत जाणे आणि घरी येणे हा रामूचा दिनक्रम असायचा. रामूचे आई-बाबा हे शेतात काम करत असल्याने दिवसभर केलेल्या कामामुळे ते दोघे खूपच थकून जायचे. संध्याकाळी आई-बाबा घरी आल्यावर रामू त्या दोघांची आपुलकीने चौकशी करायचा. त्यांना पाणी देणे, हात-पाय चेपून देणे असे सर्व काही करायचा. जणू लंगड्याचा आधारच बनून जायचा. रामूचे आई -बाबा खूप भाग्यवान समजतात स्वत:ला कारण त्यांना रामूसारखा मुलगा त्यांच्या पोटी जन्माला आला होता. रामू शाळेत हूशार असल्याने हिर्डेकर सर त्याला वेगवेगळया परिक्षेसाठी बसवायचे. रामू हा हिर्डेकर सरांचा आवडता विद्यार्थी. हिर्डेकर सर रामूला नेहमी म्हणतात, ''तुला काहीही मदत लागली तर हक्काने माझ्याकडे यायचं.'' रामू हा स्वाभिमानी विद्यार्थी होता त्याला कितीही मदत लागली तरी तो कोणासमोर आपल्या गरजा व्यक्त करत नव्हता.

एके दिवशी रामू शाळेला जात असताना त्याच्या पायात काहीतरी टोचल्यासारखे त्याला जाणवले. त्याच्याकडे दुर्लक्ष करून अनवाणी पायाने शाळेला जातो. शाळेत त्याचं मनचं लागत नाही. कसाबसा शाळेतच बसून

राहतो. शाळा सुटल्यावर घरी येताना त्याला व्यवस्थित चालता येत नाही. तसाच घरी आल्यावर झोपी जातो. दुसऱ्या दिवशी परत शाळेत जाण्यासाठी तयार होतो. पायाला होत असलेल्या वेदना रामू कोणालाच सांगत नाही असेच चार दिवस जातात. पाचव्या दिवशी रामू ज्या ठिकाणी झोपला होता त्या ठिकाणाहून त्याला उठताच येत नाही. काय करायचं हे त्याचं त्यालाच कळत नाही. तो घाबरून ओरडू लागतो, ''आई..., बाबा..., लवकर या.'' आई-बाबा सकाळी शेतावर जाण्याच्या तयारीत होते. रामूचा आवाज ऐकताच धावत पळत येतात. रामूची आई, ''रामू का ओरडत आहेस?'' रामू, ''आई...'' रडत रडत रामू आईला मिठी मारतो आणि म्हणू लागतो, ''आई माझा पाय खूपच दुखत आहे. मला जागेवरून उठताच येत नाही.'' रामूची आई घाबरते आणि पाय बघते. पायाला बघताच आई डोक्याला हात लावते. ती रामूच्या बाबांना म्हणते, ''आवं बघा की, आपल्या पोरावर देवीचा कोप झालाय वं..., रामूच्या बाबांच्या डोक्यात विचार येतो, ते लगेच रामूच्या आईला म्हणतात, ''व्हंय मी आता जातो देवीच्या देवळात आणि विचारतात. त्याच्यावर उपाय'' रामुचे बाबा देवळात जातात आणि देवीच्या देवळात आपलं पोरगं कसं बरं होईल याचे उपाय विचारतात. त्या देवळात एक बाई व काही माणसे तिच्या सोबतीला बसलेले असतात. ती बाई अंगात आलेल्या स्वरात रामूच्या बाबाला सांगते, ''अहं... अहं... तुझ्या पोरावर अहं...अहं... देवीचा कोप झालाय अहं...अहं... तुला एक बकरं पाचशे एक रूपये, वटीचं साहित्य हे सगळं आणून देवीला चढवावं लागल अहं...अहं... तरच तुझ्या पोराचा कोप जाणार अहं...अहं....'' हे बोलून झाल्यावर ती बाई नेहमी सारखी बोलू लागते, ''आता तुला जे देवीनं कराय सांगितलंय ते कर नाहीतर तुझा पोरगा तुझा नाहीचं बघ.'' येवढं बोल्यावर सखाराम चिंतेत पडतो. तो घराकडे येतो आणि रामूच्या आईला म्हणतेा, ''मंजे... बघ आपल्या पोराला देवीचा कोप झालाय आणि जे देवीनं सांगितलंय ते नाही केल तर आपल्या हाताला नाही लागायचं पोरगं.'' रामूचे आई-बाबा देवीला देण्याचं साहित्य जमविण्यात लईचं व्यस्त झालेले असतात. रामू मात्र त्रासाने व्याकूळ झालेला असतो. त्याला शाळेची आठवण येत असते. शाळेतील शिक्षकांची आठवण येत असते. तेवढयात शाळेतील हिर्डेकर सर रामूला भेटण्यासाठी येतात. चार-पाच दिवस झाले रामू शाळेला का आला नाही याची चौकशी करण्यासाठी आलेले असतात. सर घरात येतात व रामूला म्हणतात, ''काय झालय तुला? तू शाळेला आला नाहीस? तुझा पाय इतका कसा सुजला आहे? रामू काहीच बोलत नाही रामूचे बाबा म्हणतात, ''त्याला देवीचा कोप झालाय तो बरा झाला की येईल शाळंला.'' सर म्हणाले, ''अहो कसा बरा होणार आहे रामू? त्याला रूग्णालयात घेवून गेला होता की नाही? चला आता जावूया त्याला घेवून.'' रामूचे बाबा थोडे रागातच म्हणाले, ''ओ मास्तर आमासनी ते सांगू नका, तुम्ही जा तुमच्या कामाला, आमचं पोरगं हाय आम्ही बघून घेवू. या तुम्ही.'' सर म्हणाले, ''हे बघा रामूचे बाबा मी जातो इथून पण तुम्ही सांगा घरात राहून रामू बरा होणार आहे का?'' रामूचे बाबा त्यासाठी आमची देवी हाय आमच्या पाठीमागं, देवीला बकर दिलं की होईल माझं पोरगं बरं.'' सर म्हणाले, ''काय बोलत आहात तुम्ही? देवीचा कोप? आणि तिला बकरं देणार आहात? हे सगळं करण्याची काहीच गरज नाही. ही सगळी अंधश्रध्दा आहे. तुमच्या मुलाला डॉक्टरची गरज आहे, योग्य उपचाराची गरज आहे. त्याच्याकडे बघा कसा तडफडत आहे.'' सरांनी किती सांगण्याचा प्रयत्न केला तरीही रामूचे बाबा ऐकले नाहीत त्यांनी देवीला बकरं द्यायचं ठरवलं होतं.

देवीला बकरं देण्यासाठी लोकांकडून उसने पैसे घेवून देवीला लागणाऱ्या सर्व साहित्य गोळा केले. मागणी पूर्ण केली. रामूच्या बाबानां वाटलं कि, आता आपलं पोरगं बरं होणार पण पोरगं बरं न होता त्याचा त्रास आणि सूज वाढत होती. पोरंग किती तळमळतंय हे बघून आई-बाबाचा जीव तुटत होता. त्यांना सरांनी बोललेलं आठवले, ''पोराला देवाची नाही तर डॉक्टरची गरज आहे'' त्या दोघांनी क्षणाचाही विचार न करता रूग्णालयाकडे धाव घेतली. दोघांनी रामूला एका लहान बाळासारखं उचलून घेतलं होतं. रामूला असहय वेदना होत होत्या. त्याचा त्रास इतका वाढला होता की, तो समोरच्या व्यक्तीलाही ओळखू शकत नव्हता. डॉक्टरांनी रामूला पाहिले. त्याला तपासणी कक्षेत घेवून जाण्यात आलं. थोडया वेळांनी डॉक्टर बाहेर आले. डॉक्टरांनी रामूच्या आई-बाबांना सांगितलं, ''हे बघा रामूला खूपच मोठी जखम झाली आहे त्याला इन्फेक्शन झाले आहे. जर तुम्ही चार-पाच दिवसाआधी त्याला घेवून

आला असता, तर कदाचित ऑपरेशन करण्याची वेळ आली नसती. रामूच्या पायाला काटा आतपर्यंत रूतला आहे. त्याचा एक पाय निकामी झाला आहे.'' डॉक्टरांनी हे सांगताच रामूची आई रडू लागते. दोघेही काळजावर दगड ठेवून ऑपरेशनसाठी परवानगी देतात.

रामूचं ऑपरेशन होतं आणि रामूला घरी आणलं जातं. रामूला वाईट वाटत असतं की आपण आता इतरांवर अवलंबून राहणार. रामूच्या आई बाबांनी रामूच्या आजारपणाबद्दल कोणालाच सांगितलेलं नसतं. खूप दिवसांनंतर रामूची आत्या घरी येते. ती खूपच खूश असते. कारण तिने रामूसाठी काहीतरी वस्तू आणलेली असते. रामूची आत्या विचार करते, ''आपण आणलेली वस्तू बघून रामू लयचं खूश होणार.'' रामू हा खाटेवर झोपलेला असतो तेवढयात कमला येते, ''रामू... रामू...'' आत्याची हाक ऐकताच रामू झोपेतून जागा होतो. आत्या त्याला म्हणू लागते, ''रामू बघ मी तुझ्यासाठी काय आणलंय.'' रामू आणलेली वस्तू उघडून बघतो तर त्यात एक जोड पायात घालण्यासाठी चपला असतात. त्या चपला बघून रामूच्या डोळयात पाणी येतं. रामू त्याच्या आत्याला म्हणतो, ''आत्या काय करू या चपला घेवून मला तर पायच नाही. प्रेमाने तू माझ्यासाठी वस्तू घेवून आलीस, तू तुझं वचन पूर्ण केलस, पण वेळ संपल्यावर.'' येवढं बोलून रामू त्याच्या शाळेची बॅग घेवून एकाच पायाने वॉकर घेवून शाळेकडे जावू लागतो, जशी नवी पहाट उगवते, तशीच आशेची नवी किरण घेवून रामू पुढे चालू लागतो.

जेव्हा माणसाची इच्छा असते तेव्हा परिस्थिती साथ देत नाही आणि जेव्हा परिस्थिती साथ देते तेव्हा इच्छेपलीकडे काहीच उरत नाही.

❖❖❖

ती 'नार'

उंबरठयाच्या आत कोंडले
युगानुयुगे हळूवार
रांधा वाढा उष्टी काढा
मनी एकच विचार
फाटा देवून जुन्या विचारांना
मनावी लागली हार
ती नार ....

स्वराज्यासाठी शिवबाच्या हाती
सोपविली तिने तलवार
त्या जिजाउंच्या पुढती झुकतो
माथा वारंवार
ती नार ...

मेरी झाँसी नही दूँगी ची
जिने दिली ललकार
पुत्र बांधूनी पाठीवरती
केला शत्रूशी रणकंधार
ती नार ...

युग बदलले काळ बदलला
झाला तिच्या गुणांचा स्वीकार
ध्येय गाठण्या उचलले पाऊल
सांभाळून घरदार
ती नार ...

भ्याडपणाच्या तोडून शृंखला
घेतली भरार
ती नार ...

धैर्य, शौर्य कर्तृत्वाने
बनली मूर्ती तजेलदार
राष्ट्रपतीपद भूषविले
प्रतिभाताईंनी भरदार
ती नार ...

शिवसागर कल्लुप्रसाद निषाद
बी.ए. १

माहितीपर लेख

कोकणातील आंब्याचा सिझन

ओंकार निलेश मेस्त्री, बी.एस्सी. ३

आपल्या सिंधूदुर्ग, रत्नागिरी जिल्हयामध्ये जेव्हा आंब्याचा सिझन सुरू होतो तेव्हा एक वेगळाच आनंद असतो. त्या प्रत्येक बागायतदाराकडे!

कारण की, ही लागवड संपूर्ण वर्षभराची त्यांची मेहनत असते. पावसाळा असू दे, हिवाळा वा उन्हाळयाची कडक गरमी असू देत प्रत्येक महिन्यात व दिवसात त्यांची काळजी घ्यावी लागते. जेव्हा बागायतदार आपल्या कलमातले आंबे काढायला जातात तेव्हा त्यांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद असतो. ती वर्षभराची मेहनतीच चीज होणार असतं व आपलं फळ एका दुसऱ्या शहरात वा परदेशी जाणार असतं. एखाद्या बाळाप्रमाणे त्या फळाची काळजी घेत असतात. आता बहुसंख्य बागायतदार आपल्या कलमांमध्ये ४-५ महिन्यांसाठी नेपाळी माणसे ठेवतात. आंबे बागेतून काढून आणायचे तसेच मोहोर आलेल्या कलमांवर वेळोवेळी लक्ष ठेवायचं ही त्यांची रोजची कामे असायची.

मी हे जवळून बघितलेलं आहे. माझे हे काम करण्यात व बघण्यात खूप आनंद असायचा माझ्या बाबांचे मित्र बागायतदार असल्यामुळे आम्ही कुतूहल म्हणून जायचो. आंबे झाडावरून काढतात व त्यांच्या देठाला धक्का न लागू देता पोहचता व ते एका फायबरच्या क्रेटमध्ये कसे ठेवायचे, त्यांना टेम्पोमधून घरी आणून त्या सर्व आंब्यांना स्वच्छ पुसायचे व बॉक्समध्ये भरायचे ही त्यांची कामे महत्वाचे म्हणजे व्यवस्थित डझनावर आंबे देवून वाशी मार्केटला पाठवायचे ते सर्वात महत्वाचे त्यामुळेच ग्राहकांची पसंती कळणार की त्या फळाची चव कशी आहे, त्याची क्वालिटी कशी आहे त्यामुळे आपण त्यांची काळजी, संगोपन कसे करायचे ही महत्वाची बाब असायची. मी जेव्हा निरीक्षण करायचो तेव्हा बागायतदारांच्या थोडया कलमांच्या बागा असायच्या. काही कलमे मालक स्वत:च्या मित्रांच्या किंवा ओळखीच्या खात्रीपूर्वक माणसांच्या माध्यमातून करत कारण की त्यांची मुले कामानिमित्त, शिक्षणानिमित्त मुंबई, पुण्यासारख्या ठिकाणी गेल्यामुळे होणाऱ्या गैरप्रकारे होवू नये व लावलेल्या कलमांची नासाडी होवू नये हा त्यामागचा हेतू असतो.

जेव्हा थंडीची चाहूल लागते तेव्हा सर्व कामगार आपापले टेम्पो घेवून फवारणीचं साहित्य घेवून रोज बागेत जातात. प्रत्येक फांद्या - फांद्यांवर चहूबाजूने विशिष्ट प्रकारच्या केमिकलची फवारणी करतात. त्यात उपयोग म्हणजे त्या कलमांवर कीड लागू नये म्हणून त्या

केमिकल्सची सुद्धा पुरेपूर फवारणी केली जाते. विशिष्ट कालावधीनंतर मोहोर लागायला सुरूवात झाली की, फळे लागायला सुरूवात होतात.

त्यानंतर सर्व कामगार जेव्हा आंबे काढायला सुरूवात करतात तेव्हा एक विशिष्ट प्रकारची आंबे काढायची काठी, मालवणी भाषेत आंबे काढण्याच्या काठीला 'शिकारणी' असे म्हणतात. ती शिकारणी म्हणजे आठ ते दहा फुटांची वेताची काठी असते. त्याच्या सुरूवातीच्या टोकाला निळया कलरची जाळी बांधलेली असते व टोकाला एक धारदार ब्लेड लावलेले असते. त्या शिकारणीत एका वेळेला ३-४ आंबे काढता येतात. शिकारणीने काळजीपूर्वक अर्ध्या देठातून आंबा तोडला जातो. ही पध्दत आंबे काढायला वापरली जाते. एका वेळी वेगवेगळया कलमावर दोन ते तीन लोक चढतात व उरलेले एक-दोन आंबा व्यवस्थित मधे क्रेट्स भरतात. क्रेटमध्ये प्रथम पेपर झाकून ठेवून असतो व त्याचा बेस म्हणतात त्यानंतर आंबे आडव्या पध्दततीने ठेवले जातात ते अशा प्रकारे ठेवतात की, त्यांचा देठ दुखवू नये व चीक बाहेर पडू नये. त्यानंतर परत पेपर परत आंबे असे आंबे ठेवले जातात. भरून झाल्यानंतर क्रेट्स खूप जड होतात.

त्यानंतर दुपारच्या सुमारास ४ वाजता सगळे कामगार घरी येतात. आंबा पॅकींग करायचा त्यानंतर ते सर्व आंबे पुसावे लागतात व एक शेणाणे सारवलेल्या शेडमध्ये एक भिंती लगत ते रचले जातात. मी जेव्हा जायचो तेव्हा ते काका स्वत: पूर्ण आंबे व्यवस्थित थर रचत. मी त्या काकांना 'हॅट्स ऑफ' करतो. मग त्यानंतर महत्वाचा भाग असतो तो पॅकिंग करायचा. पॅकिंग करण्यासाठीपण ३-४ जण कामगार व त्यांचे मुलं-मुलीसुद्धा आवडीने हे कार्य करायचे. एका लाकडाच्या मोठया गिरणीमधून घाऊकमध्ये लाकडाच्या फळ्या आणायच्या व त्यांना ठोकून चौकोनी पेटी बनवायचे हे काम त्यांचे असते. त्यानंतर त्या लाकडी खोक्यांना तळामध्ये परत पेपर अंथरून त्यावर गवत सुकलेले टाकून त्यानंतर आंबे देठाला धक्का न लागता त्याच रचनेने थरावर थर लावून भरले जातात. त्यानंतर लाकडी पट्टयाने वरून व बाजून खिळे ठोकून पेटी पॅक करायची व एका पॅकींग पट्टीने क्लिपला जोडून पेटी पूर्ण पॅक करून त्यांचे वनज करायचे.

त्यामुळे ही पेटी खूप खास होते त्यांच्या मेहनतीची, कष्टाची! सर्व लाकडी व पुठ्ठयांच्या खोक्यांना आपल्या ब्रॅण्डची एक पट्टी लावून किंवा साच्याने/ब्रशने शाईत बुडवून आपली ओळख त्या पेटीवर लिहून व तसेच किती डझनची/नगाची माहिती त्यावर लिहिलेली असते. ते आंबे किती दिवसांनी उघडावेत याचीसुद्धा तारीख त्यात आपण नमूद करावी लागते. ही सगळी धडपड मी बघितलेली व अनुभवलेली असल्यामुळे त्या कोकणातील बागायतदारांची उदरनिर्वाह होतो व त्यानंतर सर्व आंबे लोकलच्या वाशी मार्केटला जाणाऱ्या टेम्पोमधून सहज 'ठाकूर देसाई' मधून वाशी मार्केटला मोठया आयशर ट्रकमधून पाठवतात. मगच तो आंबा आपल्यापर्यंत पोहोचतो.

या सर्व गोष्टी खूप भारी आहेत अनुभवायला व एखाद्या कामात आपलं मन रमवायला ते मी कोकणात अनुभवलंय! याची प्रक्रिया कशी असते व त्यामागे केलेली धडपड आपल्याला कळावी या उद्देशाने आपण सर्वांनी एकदा तरी याचा अनुभव घ्यावा त्यामागचं सुख महत्वाचं...!

❖❖❖

नशीब

नशीब कोणी दुसरं लिहित नसतं,
ते आपल्याच हाती असतं,
येताना काही आणायच नसतं,
जाताना काही न्यायचं नसतं,
मग हे आयुष्य तरी कोणासाठी
जगायचं असतं खरं
तर याच प्रश्नाचं
उत्तर शोधण्यासाठी
जन्माला यायचं असतं...

कु. प्राजक्ता दत्तात्रय गोरे
बी.एस्सी २

एका खोलीतला प्रवास !

एक काळ होता
ते एका खोलीतला प्रवास
कठीण पण खूप छान होता...

ते कौलाचे छप्पर
पावसाळयात गळके तरी,
उन्हाळयात फार गारवा द्यायचे...
टाईलची फरशी नव्हती
पण शेणाने सारवलेल्या त्या जमिनीवर,
दमलेल्या जीवाला शांत झोप लागायची...
त्या खलबत्यात कुटलेल्या चटण्या
स्पायसी आणि चिझी नसल्या तरी,
चविष्ट असायच्या...
रोटी आणि नान पेक्षा
चुलीवरच्या भाकऱ्यांचा,
नाद नाही करायचा...

गाडी पार्किंगसाठी भला मोठा पोर्च नव्हता
पण त्या छोटयाशा अंगणात
तुळशीचा कट्टा आणि ठिपक्यांच्या
रांगोळया सजायच्या
कसला फॅन आणि कसली लाईट
चिमणीच्या प्रकाशातच
भीमराव घडायचा...

फ्रिज वगैरे असलं काही नव्हतं
पण त्या डेऱ्यातल्या पाण्याचा स्वाद
आहा, तो गारवा आता कुठे सापडायचा...
आईच्या साडयांची तिच्याच हातून शिवलेली गोधडी
त्याला ठिगळ लावून पार त्याचा इंद्रधनुष्य बनायचा
पण या गोधडी मध्ये मायेचा स्पर्श जाणवायचा...

इथं प्रॉपर्टीसाठी भांडणं नव्हती,
कारण एक खोली ती
प्रत्येकाला पाय ठेवता येईल
इतकीच जागा होती...
त्यामुळेच की काय,
भावा भावातली माया,
अमाप होती
अशिक्षित असले तरी
संस्कार, संस्कृती, माया, भूतदया
आणि प्रचंड असा जिव्हाळा
ठासून ठासून भरला होता...
तो एक काळ होता
एक खोलीतला प्रवास
कठीण पण खूप छान होता...

कु. पल्लवी रामेश्वर लिगाडे
बी.सी.ए. ३

मी अनुभवलेला पाऊस...

कु. रिया राजेंद्र सूर्यवंशी, बी.कॉम.२

काही आठवणी विसरून जायच्या म्हटले तरी न विसरता येणाऱ्या असतात. केव्हातरी त्या मनाच्या कोपऱ्यातून बाहेर येतात आणि पुन्हा एकदा त्या सगळया अनुभवांची एक सफर करून येतो असाच एक अनोखा अनुभव 'मी अनुभवलेला पाउस'' तस बघायला गेलं तर पावसाळा हा सर्व हंगामातील सर्वोत्तम हंगाम मानला जातो. पावसाळयाच्या दिवसात संपूर्ण वातावरण आनंदाने भरून जाते. मग ती मुले, मोठी माणसे किंवा वृध्द लोक असोत प्रत्येकाला हे दिवस अगदी मनाला भावणारे असतात.

काही वर्षांपूर्वी जेव्हा इयत्ता पाचवीत होतो तेव्हा सकाळी मी शाळेत जाण्यासाठी उठले आणि शाळेत जाण्यासाठी तयार झाले. हा दिवस पावसाळयाचा होता. जुलै महिन्यात बाहेर हवामान गडद आणि अंधुक होते. माझ्या मनात मी परमेश्वराला सतत प्रार्थना करत होते की जर पाउस पडला तर शाळेला सुट्टी! आईने माझा लंचबॉक्स पॅक केल्यावर मी शाळेत जाण्यासाठी तयार झाले. पण पाउस पडला नाही आणि मला जावे लागले. माझ्या बाबांनी मला शाळेत सोडले. पावसाळा म्हटला तर मला काही कविताच्या ओळी आठवायला लागल्या ... कातर वेळचा गार वारा, तुझी स्मृती घेउन भेटतो, मिट्ट काळोख येता गारवा, पाउस अलगद मनात दाटतो वर्गात मी पावसाच्या अपेक्षेने खिडकी जवळ एका बाकावर बसले. सर्व लक्ष्य पावसाच्या आशेने खिडकीच्या बाहेर जात होते. माझा गणिताचा क्लास संपताच माझी इच्छा पूर्ण झाली.

पाऊस सुरू झाला ! पाऊस सुरू झाला आणि वर्गात कोणतेच शिक्षक नव्हते. माझे डोळे आनंदाने चमकले आणि मी पावसाच्या थेंबाचा आनंद घेण्यासाठी खिडकीतून

डोकावण्यासाठी माझ्या बाकावरून उडी मारली. मी पावसाचे थेंब समजून घेण्याचा प्रयत्न करीत होते आणि यामुळे मला खूप आनंद झाला. वर्गातील प्रत्येकजणांना आनंदी-आनंद झाला. प्रत्येकजण उडया मारत होते, गप्पा मारत होते आणि आनंदाने हसत होते. मी आणि माझ्या वर्गमित्रांनी आमच्या पुस्तकांमधून काही पृष्ठे फाडली आणि कागदाच्या बोटी बनवल्या. खिडकीच्या बाहेर छोटे तळे होते आणि आम्ही आमच्या बोटी बनवल्या. खिडकीच्या दारातून पावसाचे थेंब पकडून एकमेकांवर फेकत होतो. थोडया वेळाने आमचे विज्ञानाचे शिक्षक वर्गात आले आणि प्रत्येकजण त्यांच्या जागेवर जाउन बसला.

काही वेळात पाऊस जोरदार पडेल अशी अपेक्षा असल्याने त्यांनी सुट्टी जाहीर केली. आम्ही सर्वजण आमच्या जागेवरून उतरलो आणि दप्तरात साहित्य भरले. आपल्या रेनकोटमध्ये प्रवेश केला आणि पावसाचा आनंद घेण्यासाठी वर्गाबाहेर पळत गेलो. आम्ही पावसात उडया मारत, खेळत नाचत घरी परतले. मी थोडासा भिजल्यामुळे आई रागावली आणि मग तिने मारलं आणि तुलसीचे पान टाकून गरमागरम चहा बनविला तो चहा पिउन त्या पावसाळयाचा आस्वाद घेतला.

माझा आयुष्यातील हा एक उत्तम दिवस होता. 'पावसाळा' हा ऋतु सर्वांच्या आयुष्यामध्ये उत्साह आणि बहर आणतो.

❖❖❖

मायबाप विठ्ठल

पंढरीच्या विठुराया
थोडं तुझ्याशी बोलायचं होतं
नाही नाही काही मागायचं नाही
थोड मन मोकळ करायच होतं
कसा आहेस? बरा आहेस का रे?
नाही? युगे अठ्ठावीस विठेवर उभा तू
म्हटलं विचारावं,
गुडघ्याचा त्रास तुलाही होतो का रे?
यंदा वारीला यायची माझी बी लय इच्छा होती
पण काय करू,
या पायांनी पार गाळाटून गेले बघ
आयुष्यभर केल, रांधा वाढा उष्टी काढा
या सगळयामध्ये तुला भेटणं राहूनच गेलं बघ
पण तू मात्र कोणत्या न कोणत्या रूपात,
रोज मला दर्शन देतच आलास
पडले कोणत्या संकटात कधी
तूच तर पहिला धावून आलास
आजवर खूप काही मागितलं मी
आणि तू ही सगळकाही भरभरून दिलस
पंढरीला येण मला कधी जमलंच नाही,
पण तू मात्र न चुकता मला माझ्या
देव्हाऱ्यातच दर्शन दिलस.
विठुराया नवल वाटलं मला तुझ
कसं रे सगळं सांभाळून घेतोस?
कमरेवर हात ठेवून
कसा बरे जगाचा कैवारी होतोस?
थकून नाही कारे जायला होत तुला?
प्रत्येकाची माउली होतोस
भक्ताचे दुख हरण्यासाठी
देवा स्वत:विठेवर उभा राहतोस
चंदनाचा टिळा आणि सावळी काया घेवून
कसा ब्रम्हांडाचा पाया होवून उभा राहतोस?
प्रत्येक संकटातून वाचवून तुझ्या लेकराला
पांडुरंगा अरे तुच तर आमचा,
मायबाप होतोस
तूच तर आमचा मायबाप होतोस...

कु. पल्लवी रामेश्वर लिगाडे
बी.सी.ए. ३

चिंतनपर लेख

हॅलो... ! मी तुमचा मोबाईल बोलतोय...

कु. श्रुती राजकुमार राजमाने, बी.कॉम. २

हॅलो! हॅलो!! हा हा मीच तुझ्या हातात आहे. मीच तुझा मोबाईल बोलतोय. आज मी तुला खूप काही सांगणार आहे. मला तुझ्यासोबत खूप गप्पा देखील मारायच्या आहेत. सकाळी सकाळी उठल्यानंतर तू मला दररोज चालू करतो तेव्हा मला खूप आनंद होतो. उठल्यानंतर तू पहिल्यांदा माझ्याकडे आल्यानंतर मला जग जिंकल्यासारख वाटतं. हो मी तुझा मोबाईल बोलतोय.

येत्या काळामध्ये मी दिवसेंदिवस छोटा आणि खूप फास्ट होत आहे. येत्या काळामध्ये मानवाने मला खूप चांगल बनवलं आहे. काही दिवसांपूर्वी मी एका बटणाच्या स्वरूपात तुमच्यासमोर होतो. परंतु आता मी एकाच स्क्रीनटच स्मार्टफोन. आणि त्याचनंतर स्मार्टवॉच मध्ये देखील होतो. कारण तुम्ही मला चार-पाच तास सलग वापरता आणि मधे कोणत्याही प्रकारचा ब्रेक देखील देत नाही तेव्हा मला खूप त्रास होतो.

मला तुमच्या सर्व गोष्टी माहित आहेत. कारण कोण फोनवर बोलतो ते देखील मी ऐकत असतो. तुम्ही कोणासोबत व्हॉट्सअॅप चॅटींग केली ते देखील मी बघत असतो. तुमच्या सोबत मी यूट्युब मुव्हीज आणि खूप काही बघत असतो म्हणून मला तुम्ही चालू केल्यानंतर खूप आनंद होतो. कोरोना आल्यापासून माझा वापर खूपच जास्त प्रमाणात सुरू झाला आहे. ज्या शाळेमध्ये मला वापरण्यासाठी परवानगी नव्हती तीच शाळा आज माझ्यामुळे चालू आहे तेदेखील ऑनलाईन माध्यमातून पेपरला मला नेल्यानंतर विद्यार्थ्यांला खूप उदंड शिक्षा व्हायच्या परंतु आज माझ्यावरच तुम्ही पेपर देत आहात. यामुळे मला खूप आनंद होत आहे. हे जग दिवसेंदिववस चांगल्या प्रकारे विकसित होत आहे. हे मी बघत आहे.

काही दिवसानंतर तर तुम्ही माझा खूप जास्त प्रमाणात वापर करणार आहात. अर्थातच तुम्ही घरीबसून माझ्यावर काम करून पैसा कमावणार आहात. यामुळे मला आजून जास्त मज्जा येईल परंतु मला खूप दु:ख होतं की तुम्ही झोपताना मलासुद्धा डोळे झाकेपर्यंत मला सोबत ठेवत असता. माझ्या अतिवापराने तुम्ही इतके असंवेदनाशील होत आहात कि तुम्हाला आजूबाजूचे जग सुद्धा आपल्या डोळ्यानी पहावे याची जाणीव होत नाही. तुमच्या चांगल्या आरोग्यासाठी आणि उज्वल भविष्यासाठी माझा वापर प्रमाणात करा. आपली मैत्री कायम राहिल.

❖❖❖

ती लावण्यवती आहे...!

चंद्रासम रूप तिचे
उर्वशी अप्सराच जणु दुसरी
जेव्हा ती लागते नाचायला ढोलकीच्या तालावर
वाटते, या भूमी अवतरली रभांच दुसरी!
तिच्या पायातले घुंगरू
म्हणजे जणु तिचा जिवच
ती त्या घुंगराच्या सादासोबत इतकी
बेधुंद होवून नाचते
की कोणाला दिसते तिच्यात एक देखणी लावण्यती
तर कोणाला एक तमासगिरी वेश्या भासते!
मग सुरूवात होते लागण्या ग्रहण
त्या देखण्या चंद्राला
आणि पुन्हा त्या रंभेचे घुंगरू इंद्रदरबारातच
बंदिस्त होवून राहतात
पोटासाठी नाचणाऱ्या या पवित्र देहाला मग,
हे लोक रखेल म्हणवतात!
देह तसा तिचा कोराच होता,
मात्र बलात्कार झाला तिच्या घुंगरावरती
जेव्हा माळेमधला एक एक घुंगरू विखरला जमिनीवर
तेव्हा मात्र कित्येक वार झाले
तिच्या काळजावरती!
ती वेश्या नाही
ना ती रखेल आहे
ती देवाकडून कलेचे दान घेवून आलेली
एक कलावंत लावण्यवती आहे!
एक कलावंत लावण्यवती आहे!

कु. पल्लवी रामेश्वर लिगाडे,
बी.सी.ए. ३

काळा कोट

एके रात्री स्वप्नात मला
आला एक काळा कोट
म्हणे मला लॉ केला का तू?
खोटी आश्वासने दिला तू
या खोट्या जगात विसरून गेलास तू
कर ध्येय पूर्ण तू
कर स्वप्ने पूर्ण तू
स्वप्ने तुझी कर साकार तू
काळा कोट घालूनी
ताट तुझी छाती ठेव
उभा कधी राहशील तू
काळा कोट घालशील का तू

कु. प्रतिक्षा रविंद्र कांबळे
बी.कॉम भाग ३

झरा

पाणी म्हणजे कसं हलकं,
सहज वाहून जाणार,
थांबता थांबवल तरी न
थांबवणारं...
ढगड म्हणजे खडक
जराही न कलणारा
फोडता जरी फोडला तरी
न फुटणारा ...,
असे हे ढोघे एकत्र येतात
एकत्र येवून झरा म्हणून
वाहतात
वाहत वाहत वाहतात
खूप दूरवर जातात
ढगड घेतो गारवा
स्वार्थ साधून आपसूकच
पाणी ही करते वाट
ढगडावरून
साधत फायदा गूपचूप
ढोघे एकत्र आहेच तीपर्यंत
चांगल
नसतील एकत्र तेव्हा सारं
काही वेगडे
बरं तै सारं ठीक आहे
जोपर्यंत चार दिवसाचा
पावसाळा...
पण तेव्हा काय होईल
जेव्हा
पडेल उन्हाळा...
जेव्हा पडेल उन्हाळा...

विजयसिंह बाळू कदम
बी.कॉम १

वैचारिक लेख

मी माझ्या देशाचा नागरिक

कु. सिद्धी सुबोध कुंभार, बी.कॉम. २

स्वातंत्र्य मिळाल्यापासून अनेक गोष्टींच स्वरूप बदलायला लागलं आहे. रोज सकाळी प्रार्थना, प्रतिज्ञा मग नंतरच शाळेतले तास सुरू व्हायला लागतात. परत शाळा सुटताना शेवटची प्रार्थना वंदे मातरम असायची. यातून देशप्रेम, राष्ट्रभक्ती शिकायला मिळायचे. मोठयांचा आदर करणे शिकायला मिळायचे. यातील बऱ्याच गोष्टी सध्या लूप्त झाल्या आहेत. म्हणूनच स्वत:ला विचारा मी या देशासाठी काय करतो?

देशाला स्वातंत्र्य मिळून ७७ वर्षे झाली तरीही आपण अजून विकसनशील देशाच्या यादीतच आहोत. याची अनेक कारणे आहेत. आपण साधे देशातील नियम पाळू शकत नाही. नियम मोडणे हेच आपल्याला स्वातंत्र्य वाटते. इतर विकसित देशांशी तुलना करता त्यांचे लष्करी सामर्थ्य, पैसा, पायाभूत सुविधा यांचा आपण विचार करतो. पण तरीही त्या देशातील लोकांची मानसिकता आपण जाणून घेत नाही. ते वाहतुकीचे नियम पाळतात, ते नियम मोडणाऱ्याला मग तो पुढारी असो, सेलिब्रेटी असो त्याला शिक्षा होते. ते न चूकता कर भरतात. सार्वजनिक ठिकाणी थुंकत नाहीत. स्थानिक प्रशासनाने जी चौकट घातली आहे ती त्यांना बंधन वाटत नाही. आपण मात्र अगदी त्याच्या उलट वागतो. 'येथे शांतता राखा' असे लिहिले असेल तर हमखास दंगा करतो. 'येथे थुंकू नये' असे लिहिलेल्या पाटीवरच लाल पिचकाऱ्यांची रांगोळी असते. 'नो पार्कींग' ची पाटी असते तिथेच गाडया आडव्या तिडव्या लावलेल्या असतात. असे अनेक नियम हे मोडण्यासाठीच असतात अशी आपली धारणा असते.

आजकाल अभिव्यक्ती स्वातंत्र्य देशातील सगळयात मोठे स्वातंत्र्य असल्याचा समज समाजमाध्यमांनी पसरवलेला आहे आणि हे स्वातंन्त्र्य दाबले जाते म्हणून आरडाओरडाही केला जातो. गेल्या चार-पाच वर्षांत वर्तमानपत्रांमध्ये एखादा विषय चर्चिला जात नाही, तितका समाजमाध्यमांमध्ये चर्चिला जातो. फेसबुक, ट्वीटर अशा समाजमाध्यमांमधून एक मोठा वर्ग व्यक्त होत आहे. यांत विषयांचे बंधन नाही. अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या नावाखाली मी काहीही लिहू शकतो, बोलू शकतो. याला जर कोणी अटकाव करण्याचा प्रयत्न केला तर आहेच पुढे अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणल्याची ओरड. या सगळयात आजची तरूणाई काही वेगळा विचार करते का? देशावर त्यांचे प्रेम आहे पण ते फक्त स्वातंत्र्यदिवस व प्रजासत्ताक दिनालाच उफाळून येते.

आम्ही जबाबदार नागरिक व्हायचे म्हणजे काय करायचे? हे समजून घेण्यासाठीच दूर जाण्याची गरज नाही. आपली प्रतिज्ञा आपण प्रामाणिकपणे पाळली तर नक्कीच उत्तम नागरिक होऊ शकतो. काय सांगते ती प्रतिज्ञा? आपण सर्वांशी सौजन्याने वागले पाहिजे. वडिलधाऱ्यांचा आदर केला पाहिजे देशबांधवांच्या कल्याणासाठी झटले पाहिजे. काय सुचवते ही प्रतिज्ञा? आपण सौजन्याने वागायचे ते केवळ दुसऱ्यांना बरे वाटावे म्हणून नव्हे तर सौजन्यातून आपण दुसऱ्यांच्या भावभावनांचा मान राखतो. आजही अनेक तरूण आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात चांगले काम करत आहेत. तरूणांची ही उर्जा जेव्हा मार्गी लागेल तेव्हाच या देशाचा उत्कर्ष होईल. तेव्हाच देश महासत्तेच्या दिशेने वाटचाल करू शकेल.

स्त्रियांचा आदर करणे ही देशभक्तीच आहे. भ्रष्टाचारास उत्तेजन न देणे, लाच न देणे, जात आणि प्रांतवादाचा पुरस्कार न करणे ही देशभक्ती आहे.

'सर्वप्रथम मी या देशाचा आहे' हा विचार, ही भावना रूजवायला हवी. ते काम आपण आज, आता, स्वत:पासून करूयात! 'कल करे सो आज कर, आज करे सो अब...!' ही उक्ती सार्थ व्हावी. माझ्या देशबांधव तरूणाईला मी आवाहन करते की, आपल्यातील भेदभाव सोडून एक व्हा, एकीची साखळी मजबूत करा, असे झाले तरच आपला भारत देश बुलंद होईल. जय हिंद ! जय भारत !!

❖❖❖

थंडीची चाहूल

हिरव्या हिरव्या गवताच्या पातीवर
दवबिंदूचा सडा
धुके पसरले सगळीकडे
गुलाबी थंडीने केलाय पसारा
त्यातच कोवळया किरणांची चाहूल
देते मनाला स्पर्शून जाणारे सुख
निसर्ग सजला धुक्याने
झाडे भिजली दवबिंदूंनी
हे मोहक दृश्य पाहताना
मन गेले भारावून

कु. प्रियंका शिवाजी सुर्यवंशी, बी.ए. भाग १

शेतकरी

बांधावर तू चालू नको
बांध तू मोडू नका
शेतीसाठी केली गुंतवणूक
त्याची आपणं टाळू पिळवणूक
शेतकरी लावतो पिके शेतात
म्हणून माणसे जीवन जगतात
आहे तो जनतेचा पोशिंदा
मग त्याच्याच का नशिबात फासीचा फंदा
सूर्योदयाच्या आधी उठतो तो
सूर्यास्तानंतर झोपतो तो
दिवसभर शेतात राबतो तो
येवढं सगळं करून
कवढी मोलच का घरी घेवून येतो तो
शेतात राबतो शेतकरी
तेव्हा खायला मिळते भाकरी
महापूराच्या येवून जातात लहरी
पण मदतीला येत नाही सहकारी
आहे त्याचं जीवन खडतर
त्याला मदत केली पाहिजे हातभर
कारण मदतीला नसतो सरकार
म्हणूनच शेतकरी होतो कर्जबाजार

कु. कोमल कांबळे
बी.एस्सी. १

ती

मुलगी होणं सोपं नसते
नेहमी दुसऱ्यांच्या मनाप्रमाणे वागावे लागते
स्वत:पेक्षा जास्त दुसऱ्यांचा विचार करावा लागतो
प्रत्येक गोष्टीत दुसऱ्यांचा सल्ला घ्यावा लागतो
आयुष्य जरी तिचे असले तरी निर्णय मात्र दुसरेच घेतात
तू हे नाही करू शकणार हेच तिला सतत सांगतात
तिच्या कपडयांवरून तिचे संस्कार काढले जातात
समाजातील लोक नेहमीच तिला कमी समजतात
नऊदिवस देवीची उपासना करणारा हा समाज
मुलींचीच किंमत करत नाही
हजारो बलात्कार सहन करणारा हा समाज
एक प्रेमविवाह समजून घेत नाही
आज कित्येक वर्षे झाली स्वातंत्र्य मिळून देशाला
पण मुलींना मात्र स्वातंत्र्य दिलेच नाही
आजही मुलगी सातच्या आत घरात लागते
पण मुलगा मात्र रात्री बारा वाजता देखील कट्टयावर दिसतो
आजही मुलीची मान खाली लागते
आणि मुलगा मात्र आई वडिलांना शिव्या घालताना दिसतो
परक्याचे धन म्हणून माहेरी ऐकवतात
दुसऱ्यांची पोर म्हणून सासरी वागवतात
तिलादेखील मन आहे हेच सगळे विसरतात
का तिच्यावर एवढे अन्याय करतात
माहेरी आई वडिलांच्या म्हणण्यानुसार वागावं लागतं
तर सासरी प्रत्येकाचं मन जपावं लागतं
सासर आणि माहेर ही दोन घरे असूनही ती बेघर आहे
मुलगी म्हणून जन्माला आली हिच का तिची चूक आहे

कु. वैष्णवी बाबुराव घोडके
बी.एस्सी १

कुटुंबसंस्थेचे भविष्य...

कु. सिद्धी सुबोध कुंभार, बी.कॉम. २

कुटुंब...!

कुटुंब म्हटले की आठवतात मायेची नाती... कुटुंब म्हटले की आठवतात मायेची माणसं, हक्काची माणसे... कुटुंब म्हंटलं की आठवतात एकमेकांना भरवला जाणारा मायेचा घास नि परस्परांबद्दलचा विश्वास... कुटुंब ही फार मोठी शक्ती आहे, ज्या शक्तीपुढे जीवनातील मोठमोठी संकटे देखील टिकू शकत नाहीत.

खरंतर कुटुंब हे एका वटवृक्षासारखं असतं. ज्याच्या नुकत्याच फुटलेल्या पारंब्या म्हणजे कुटुंबातील लहानलहान मुलं असतात. जी हळूहळू मोठी होतात. वटवृक्षाच्या पारंब्या जशा मोठया होउन जमिनीत शिरतात व झाडाला आधार देतात त्याचप्रमाणे ही लहान मुले मोठी होउन कुटुंबाचा आधार बनतात. अशा या वटवृक्षासारख्या कुटुंबाचा मुख्य बुंधा म्हणजे आजी आजोबा असतात. त्यांचा भक्कम आधार संपूर्ण कुटुंबाला असतो. परंतु डोळसपणे पाहता समाजात अत्यंत विदारक दृष्य पहावयास मिळत आहे. भक्कम आधार असणारी हीच कुटुंबव्यवस्था आज कोलमडताना दिसत आहे. या नव्य युगाच्या वादळात अनेक कुटुंबाचे वृक्ष उन्मळून पडलेले आहेत. म्हणूनच प्रश्न पडतो खरंच कुटुंबव्यवस्था उध्वस्त होत चालली आहे का?

पूर्वीच्या काळी कुटुंब म्हटंल की, आई-बाबा, आजी-आजोबा, काका-काकू, चुलत भाऊ-बहीण, आत्या-मामा असे १५ ते २० माणसांचे भरलेलं कुटुंब असायचे. पूर्वीच्या काळी हीच कुटुंबसंस्था एकमेकांचा आधार असायची. पण जसंजसं माणूस प्रगत होत गेला, माणूस शिकायला लागला, शेती सोडून नोकरी करायला लागला आणि नोकरीच्या शोधामध्ये शहर गाठायला लागला तसं ही कुटुंब व्यवस्था विभाजित झाली. मोठया एकत्रित कुटुंबातूनं विभक्त कुटुंब उदयास आली. एक चौकटीतील कुटुंब म्हणजे 'हम दो हमारे दो' आई वडील, मुलगा-मुलगी इतकीच पण या मुलांना आजी-आजोबा, काका-काकू यांचे प्रेम मिळेल का? सणानिमित्त सर्व सर्वजण एकत्र यायचे पण त्यापुढे माणसामध्ये जसजशी प्रगती झाली तसतसे चौकोनी कुटुंबाचे त्रिकोणी कुटुंबात विभाजन झाले. आज आई-वडिल आमचा एकुलता/एकुलती एक अशीच या कुटुंबाची व्याख्या झाली

आहे. १५ ते २० कुटुंब सदस्य संख्येवरून तीन सदस्य संख्येपर्यंत ही कुटुंबसंस्था अस्तित्वात राहिली आहे. खरंच ही कुटुंबव्यवस्था उध्वस्त होत चालली आहे. या त्रिकोणी कुटुंबामध्ये आईवडील दोघेही नोकरी करतात मुलं लहान असतं तेव्हा त्याला शिशुगृहात ठेवतात मुलं जरा मोठं झालं की त्याला बालसंस्कारवर्गात ठेवतात आणि जसं ते शाळेला जायला लागतं तेव्हा त्याला हॉस्टेलला ठेवलं जातं मग या मुलाला आईवडीलांचं प्रेम मिळेल का? जरी हे त्रिकोणी कुटुंब असलं तरी एकटयानं जगायचं. नंतर मग ही हॉस्टेलची मुलं जशी मोठी होत जातात. मोठया पदव्या घेतात आणि साहजिकच अशी मुलं विदेशात जाऊन नोकरी करतात आणि त्यावेळेला त्यांचे आईवडील मात्र म्हातारपणी एकटे पडतात. त्या मुलांचं तरी काय चुकलं? त्या मुलांच बालपण कुठं गेले तर हॉस्टेलमध्ये याला दोषी कोण? जर त्याचं ठिकाणी एकत्र कुटुंब पध्दती असती तर त्याच मुलाचा सांभाळ आजी-आजोबांनी केला असता अन त्याच्यावर चांगले संस्कार केले असते पण अलिकडच्या काळात खरंच कुटुंबव्यवस्था उद्ध्वस्त होत चालली आहे. बरं याहीपुढे जाऊन मी एक किस्सा सांगते आमच्या शेजारी एक वकील मॅडम सांगत होत्या त्यांच्या अनाथआश्रमात एक इंजिनिअर जोडपे आले मूल दत्तक घेण्यासाठी. आता याचं वय अंदाजे २७ ते ३० वयाचे होते. ही दोघेही मुलं मुल जन्माला घालू शकत होते. पण त्यांच्याकडे वेळ नाही. का? तर ते दोघेही आय.टी. कंपनीमध्ये कामाला होते. दोघांनाही १५ ते २० लाखाचं पॅकेज. मग अशावेळी मूलाला जन्म देण्यासाठी वेळ नाही. पहिले नऊ महिने आणि त्यानंतर संगोपनाचे काही महिने यामध्ये त्यांचे पॅकेज वाया नाही का जाणार? आणि म्हणून हल्लीची पिढी आता मुलांना जन्म द्यायला नकार देत आहेत. मग ही कुटुंबसंस्था राहिल का... या अशा परिस्थितीमुळे पुढच्या पिढीला आत्या, काका-काकू, मामा-मामी, चुलत बहिण-भाऊ ही अशी नाती मिळतील का...? याचा आपण अंतर्मूख होऊन विचार करायला हवा.

❖❖❖

दिवाळी

आली आली दिवाळी,
बालपणींच्या आठवणींना देण्या उजाळा,
साजरी होते दिवाळी पाच दिवस,
प्रत्येक दिवसाला महत्व आपापले
फराळाचा आस्वाद घेण्याची आतुरता
दिवाळीत घरी पाहुण्यांची रेलचेल
आकाशकंदील पण त्यांनी सजतो परिसर
अनेक दिव्यांनी उजळून निघतात रात्री
पटकन पसार होतात दिवाळीचे दिवस
आपल्याला ते समजत नाहीत
निराश मन वाट पाहते
पुन्हा दिवाळी येण्याची
पुन्हा दिवाळी येण्याची

कु. प्रियंका शिवाजी सूर्यवंशी,
बी.ए.१

लालपरी

कु. प्राजक्ता दत्तात्रय गोरे, बी.एस्सी. 2

लहान मुलांच्या गोष्टीत अनेक प्रकारच्या पऱ्या असतात. त्या जरी काल्पनिक असल्या तरी अतिशय सुंदर असतात. त्यांच्या गोष्टीदेखील तशाच पण अशी एक परी आहे जी अबालवृध्दांना माहिती आहे. तिचे आणि आपले नाते हे अगदी लहानपणापासून असते ते कायमचे अगदी आपण म्हातारे झालो तरी.

लहानपणी मामाच्या गावाला याच परीने जायचो. लवकर चढून खिडकी जवळची सीट पकडून झाडे पहाण्यात वेगळेच सुख असायचे शैक्षणिक सहल तर तिच्याशिवाय अपूर्णच असायची तिच्यातून केलेला तो प्रवास जणू स्वर्गसुखच...! घाटातील तो वळणावळणाचा रस्ता आणि त्यातूनन धावणारी आपली परी.

कॉलेजच्या जीवनात तर ती कायम सोबत असते. तिची वाट पाहत रहायची रोजच्याच ठिकाणी. तिच्याशिवाय कॉलेजला जाणं व्हायचं नाही. कधी ती आली नाही की कॉलेजला दांडी मारायची. तिच्या येण्याची आतुरता मुळात असायची मनात फार कारण ती लावण्य सुंदरी कॉलेजला ने-आण करणारी सोबती असते.

ती कधी म्हणत नाही की खूप ओझं झालं. प्रत्येकाचे ती स्वागत करते. अगदी हसून आनंदाने. उन, वारा किंवा पाउस असो ती मात्र तिचं काम चुकवत नाही कोणत्याही परिस्थितीत आपलं काम चालूच ठेवते. प्रत्येकालाच ती आरामदायी वाटत नाही. काही जणांना ती त्रासदायक सुध्दा वाटते.

ती कधीच लोकांच्यात भेदभाव करीत नाही. तिचा फक्त एकच उद्देश असतो की प्रत्येकाला त्यांच्या गावापर्यंत सुखरूप आणि वेळेवर पोहचवणे, ती कधी गरिबांची रक्तवाहिनी तर कधी विद्यार्थ्यांची ज्ञानवाहिनी असते तर कधी पंढरपूरच्या विठ्ठलाची भक्तिवाहिनी होते. तर कधी दर पाच वर्षांनी देशाचे भविष्य म्हणजे जनतेचे मत व्यवस्थित योग्य ठिकाणी पोहचवणारी मतवाहिनी असते.

वयस्कर लोकांना मोफत तर कधी अर्धे तिकीट घेवून फिरवते. त्यांच्या सगळया प्रवासातील आठवणी तिने अगदी जपून ठेवलेल्या असतात. सासरी गेलेल्या मुलींना तर कधी एकदा आपण आपल्या माहेरी जातोय याची उत्सुकता लागलेली असते. ती तर वेळेच्या आधीच येवून त्या परीची वाट पाहते.

नोकरीच्या निमित्ताने जे परगावी जातात त्यासाठी तर ती जणू आनंद घेवून येणारी आनंददेवताच असते. त्यांनासुध्दा आपल्या गावाची ओढ लागलेली आहे. सणाला येण्यासाठी त्यांची धडपड पाहून ती आपल्या फेऱ्या वाढवते. त्या सर्वांना त्यांच्या गावी पोहचवण्यासाठी तिची धडपडही चालूच असते.

ती लाल भडक वस्त्र परिधान करून कोकणच्या वाडीतून कधी भल्या पहाटे तर कधी रातराणी होवून रात्रीच्या अंधारात धावते. ती नुसती प्रवासी घेवून जात नाही तर चार गावची चार वेगवेगळया आशा आकांक्षा, त्यांच्या कहाण्या, त्यांची ध्येय, आनंद सर्वकाही वाहून नेत असते. ती कधी जातपात बघत नाही. किंवा गरीब-श्रीमंत बघत नाही. सर्वांना समान वागणूक देते, तिच्या नजरेत सर्वजण सारखेच असतात. प्रत्येकजण आपला आनंद शोधत असतो. ती फक्त त्यांना त्यांच्या आनंदापर्यंत घेवून जाते.

ती खूप ठिकाणी फिरते. प्रत्येकाला आपल्यात सामावून घेत पुढे जाते. तिची ऐटच भारी असते. त्याच भारी ऐटीत ती गावाला शहर आणि शहराला गाव जोडते. दिवसभर कितीही गाव-शहर फिरली तरी शेवटी डेपोतच मुक्कामाला येते.

अशी असते ती फक्त आपली लालपरीच...! आपल्या सर्वांच्याच ओळखीची आपली लाडाची, लाडकी लालपरीं... या परीला आपण आपल्या आयुष्यात कधीच विसरू शकत नाही.

लालपरी प्रेमी...!

❖❖❖

ललित लेख

मराठी भाषेचा 'अभिजात' गौरव

कु. प्रिती राजू भिसे, बी.ए. 2

मराठी भाषेने स्वत:ची अशी समृद्ध परंपरा निर्माण करत मागील कैक शतकांपासून ती जपली आहे. ज्ञाना-तुकोबांपासून कालपर्यंच्या प्रत्येक साहित्यिकाने या प्रवासाला आपले पाय दिले आहेत. या सगळ्या पावलांनी मराठीचा 'अभिजात' पर्यंतचा प्रवास झाला आहे आणि ही अभिजात पताका आपल्याला पुढे यशस्वीपणे न्यावी लागेल.

भाषा ही केवळ संवादाचं माध्यम नसते; ती एका समाजाची विचारशक्ती, सांस्कृतिक समृद्धी आणि ऐतिहासिक वाटचाल यांची साक्ष देणारा मूर्त दस्तावेज असतो. त्यामुळेच ३ ऑक्टोबर २०२४ साली भारत सरकारने मराठी भाषेला ''अभिजात भाषा'' म्हणून दिलेला दर्जा ही एक ऐतिहासिक आणि गौरवशाली घटना ठरते. मराठी भाषेच्या शतकानुशतकांच्या परंपरेला, तिच्या सर्जनशीलतेला आणि विचारवैभवाला मिळालेला हा सन्मान म्हणजे एक सांस्कृतिक विजयगाथाच म्हणावी लागेल. ही घटना केवळ शासनाच्या अधिकृत निर्णयापुरती मर्यादित नाही, तर ती समस्त मराठी भाषिकांच्या मनात गर्वाची भावना निर्माण करणारी आहे. भाषेचं अभिजातत्व हे तिच्या प्राचीनतेत, वाङ्मयीन सखोलतेत आणि तत्वचिंतनशिलतेत दडलेलं असतं आणि मराठी भाषेनं ही सर्व वैशिष्ट्यं अत्यंत भक्कमपणे सिद्ध केलेली आहेत.

भारत सरकारने कोणत्याही भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्यासाठी काही विशिष्ट निकष ठरवले आहेत. या निकषांमध्ये त्या भाषेचं प्राचीन अस्तित्व असणं, ती लेखनासाठी वापरण्यात आलेली असणं, तिचं स्वतंत्र वाङ्मय असणं, तिच्या साहित्यात तात्त्विक विचारसरणीचा सहभाग असणं आणि इतर भाषांवर तिचा प्रभाव दिसून येणं हे आवश्यक ठरवण्यात आलं आहे. मराठी भाषेचं इतिहासातील स्थान लक्षात घेता ती या सर्व निकषांवर खरी उतरते. तिचं प्राचीन अस्तित्व ''महाजनपद काळा'' पासून आढळून येतं. विशेषत: संत ज्ञानेश्वरांनी लिहिलेली 'ज्ञानेश्वरी' ही केवळ भगवतगीतेचा अनुवाद नाही, तर एक गहन वैचारिक ग्रंथ आहे, ज्यामध्ये लोकभाषेच्या माध्यमातून तत्त्वज्ञान सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न झाला आहे. ओवीबद्ध रचना, 'महाकाव्य' पद्धती आणि आध्यात्मिक चिंतनाचा व्यापक अविष्कार – या सर्व गोष्टी मराठी भाषेला अभिजाततेच्या जवळ नेतात.

या ऐतिहासिक प्रवासात अनेक थोर विचारवंत, साहित्यिक आणि भाषाशास्त्रज्ञांनी मराठीला अभिजाततेच्या दिशेने मार्गदर्शन केलं. ज्ञानेश्वर मुळे यांच्या संशोधनातून मराठी भाषेच्या मूळांचे भाषाशास्त्रीय पुरावे पुढे आले, ज्यामुळे तिचं प्राचीनत्व अधिक ठोसपणे सिद्ध झालं. याशिवाय, गणेश देवी यांचं भाषावैविध्यावरचं काम, विशेषत: बोलीभाषा आणि आदिवासी भाषांच्या दस्ताऐवजीकरणांचं कार्य हे मराठी भाषेच्या उपप्रवाहांना केंद्रस्थानी आणणारं ठरलं. अण्णाभाऊ साठे यांचं लेखन हे समाजाल दुर्लक्षित, शोषित वर्गाच्या अनुभवांना मराठी साहित्यात स्थान देणारं ठरलं. या सर्व साहित्य प्रवाहांनी मिळून मराठी भाषेचा एक समावेशक आणि वैविध्यपूर्ण चेहरा उभा केला. यामुळे मराठी केवळ एका वर्गाची, विशिष्ट क्षेत्राची भाषा राहिली नाही, तर ती सामान्य माणसाच्या मनात घर करणारी लोकभाषा बनली.

मराठी साहित्याच्या प्रवासात संतवाङमय, लोककथा, भारूड, पोवाडे यांसारख्या शैलींनी सुरुवातीपासूनच स्थान मिळवलं. पुढे ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम, रामदास या संतकवींनी आध्यात्मिक आणि सामाजिक विचारांचे बीज रोवले. 'ओवी' सारखी पारंपरिक काव्यशैली ही केवळ भावनाच नव्हे, तर

वैचारिकतेचंही एक प्रभावी माध्यम ठरली. आधुनिक काळात या परंपरेला पुढे नेणाऱ्या साहित्यिकांमध्ये कुसुमाग्रज, ब. ब. बोरकर, ग. दि. माडगूळकर, विंदा करंदीकर, वसंत आबाजी डहाके, नामदेव ढसाळ यांचा समावेश होते. याच्या लेखनातून मराठी साहित्यात एक नवीन भाषिक जाणीव निर्माण झाली. याच भाषेला ज्ञानपीठ पुरस्कार मिळालेला आहे, जो भारतातील सर्वोच्च साहित्यिकांना मिळालेला हा पुरस्कार भाषेच्या प्रतिभाशक्तीचं आणि तिच्या अभिजाततेचं ठोस उदाहरण ठरतो.

मराठी भाषेला अभिजाततेचा दर्जा मिळणं हे जरी विलंबाने घडलं असलं तरी ती एक सन्मानाची आणि आनंदाची गोष्ट आहे.मात्र, या सन्मानाच्या पार्श्वभूमीवर अधिक महत्त्वाचं आहे ते म्हणजे – मराठीला अभिजात दर्जा तर मिळाला, पण आता पुढे काय? कारण केवळ सन्मान मिळणं म्हणजे भाषेचं भवितव्य उज्ज्वल होणं नव्हे. अभिजाततेचा दर्जा म्हणजे एक संधी आहे – भाषेच्या अभ्यासाला, संशोधनाला, आणि व्यावसायिक वापराला चालना देण्याची मराठी भाषेच्या जतनासाठी आणि वृद्धीसाठी स्वतंत्र संशोधन संस्था, विद्यापीठ आणि प्रकल्पांची आवश्यकता आहे. विशेषत: प्राचीन मराठी ग्रंथांचे संशोधन, भाषांतर आणि डिजिटलायझेशन या बाबींना प्राधान्य देणं गरजेचं आहे. ही ग्रंथसंपदा केवळ भारतातच नव्हे, तर आंतरराष्ट्रीय पातळीवरही सादर केली जावी यासाठी प्रयत्न व्हायला हवेत.

तंत्रज्ञानाच्या आधुनिक युगात भाषेचा वापर हा डिजिटल स्वरुपातही सक्षम असण आवश्यक आहे. मराठी भाषेत भाषांतर सॉफ्टवेअर, एआय मॉडेल्स, ऑडिओ बुक्स, वाचन ॲप्स यांची निर्मिती होणं आणि त्याचं सहज उपलब्ध असणं हे महत्त्वाचं आहे. सोशल मिडियावर मराठी भाषेचं अधिक प्रतिनिधित्व होणं, विविध व्हिडिओ स्वरुपांतून साहित्याचं सादरीकरण आणि नव्या पिढीपर्यंत मराठीचं पोहोचणं या गोष्टींनी भाषेचा वापर वाढतो. युट्युब, पॉडकॉस्ट, डिजिटल मासिक आणि ऑनलाईन वाचन मंच यांचा वापर करून मराठी भाषेला नव्या युगात नवसंजीवनी देता येईल.

परंतु, भाषेचं खऱ्या अर्थानं रक्षण आणि संवर्धन हे केवळ शासनाची किंवा काही संस्थांची जबाबदारी नाही. ही जबाबदारी प्रत्येक मराठी भाषिकानं स्वीकारणं आवश्यक आहे. शाळांमध्ये मराठी भाषेचा दर्जेदार आणि उत्साही उपयोग व्हावा, कॉलेजमध्ये तिचं सर्जनशीलतेनं आणि अभ्यासपूर्वक वाचन व्हावं, कार्यालयांमध्ये मराठीतून व्यवहार होण्याला प्रतिष्ठा मिळावी आणि घराघरातं मराठीचा आत्मियताने वापर व्हावा – ही साखळी तयार झाली तरच अभिजाततेला अर्थ प्राप्त होईल. विशेषत: मराठी माध्यमांत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना दर्जेदार पाठ्यपुस्तकं, अभ्यास सामग्री आणि करिअर मार्गदर्शन मराठीतून मिळालं पाहिजे. अन्यथा, मराठी ही भावनांची भाषा राहील, पण व्यवहाराची भाषा होणार नाही.

भाषा ही जिवंत राहते ती सततच्या वापराने. ती वाढते ती सर्जनशीलतेने आणि आत्मगौरवाने तिचं अस्तित्व टिकवणं म्हणजे केवळ भाषिक परंपरेचं रक्षण नव्हे, तर आपल्या सांस्कृतिक ओळखीचं जतन करणं होय. म्हणूनच, मराठी भाषेला अभिजाततेचा दर्जा मिळाल्यानंतर आता आपल्यावर जबाबदारी आली आहे – तिच्या गौरवाचं रूपांतार कृतीशील कामात करण्याची. आपण घोषणांच्या मर्यादेत राहून अभिमान साजरा करत बसलो, तर हे सन्मानपत्र फक्त एका प्रदर्शनातील वस्तूसारखं होईल. परंतु, आपण जर भाषेच्या प्रगतीसाठी कृतीशील पावलं उचलली, तर ही अभिजातता फक्त पुरस्कार नाही, तर प्रेरणा ठरेल.

आज मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाला आहे, ती जगाच्या पटलावर अधिक ठामपणे उभी राहू शकते. पण तिची उंची आपल्याला टिकवायची आहे. आपल्या कृतीने, आपल्या प्रेमाने आणि आपल्या वापराने. भाषा जपणं म्हणजे केवळ शब्द जपणं नाही, तर ती जपणं म्हणजे स्वत:चं अस्तित्व जपणं असतं. म्हणूनच चला, आपण सर्व मराठी भाषिक एकत्र येऊन, या अभिजाततेला योग्य न्याय देण्यासाठी प्रयत्नशील राहूया !

❖❖❖

पुस्तक परिक्षण

'बकुळा' - नात्यांचं भावविश्व मांडणारी कादंबरी

तुषार कोंडेकर, बी.ए. 1

सूधा मर्ती या जन्माने मध्यमवर्गीय असल्या तरी आज त्या ज्या जगात वावरतात ते एक कार्पोरेट जग आहे. या जगाचे सर्व नियम जगण्याचे संकेत वेगळे आहेत. बकुळा ही याच परंपरेतील एक चांगली कथा आहे.

